फिरत आहे. (फोटो प्रमाणे -

**प्रेस नोट ता. ०४/०१/२०२४**

**नववर्षाच्या सुरूवातीलाच फौजदार चावडी पोलीस ठाणे सोलापूर शहर गुन्हे प्रकटीकरण पथकाची दमदार कामगिरी चोरीचे एकुण पाच गुन्हे उघड करून वेगवेगळया आरोपीन कडुन एकुण ५.५ तोळे सोने,०१ मोटार सायकल तसेच वाहनाच्या ०२ बॅटऱ्या असा ३,१९,५००/- रुपये किंमलीचा मुद्देमाल जप्त केला.**

सोलापूर शहरातील एस.टी.स्टॅंड, येथे प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेवुन महिल्याच्या पर्स मधील चोऱ्याचे दागिणे चोरीस गेल्याच्या घटन स्वरूपाचे असल्याने मा.पोलीस आयुक्त , सोलापूर शहर, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा, सहा.पोलीस आयुक्त, विभाग-१, सोलापूर शहर यांनी फौजदार चावडी पोलीस टाणेकडील गुन्हे प्रक्टीकरण पथकातील अधिकारी व अमंलदार यांना सदरचे गुन्हे उघडकीस आणण्या बाबत मार्गदर्शन केले होते.

त्यानुसार सपोनि एस.एस.धायगुडे व गुन्हे प्रकटीकरण पथकातील पोलीस अंमलदार यांनी सदर चोरीचे गुन्ह्यांचे घटनास्थळी भेट देवुन सदरचे गुन्हे करणारे गुन्हेगारांचे, गुन्हे करण्याचे पध्दतीचा अभ्यास केला. त्या अनुषंगाने गुप्त बातमी दारा मार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, सदर गुन्ह्यातील संशयीत महिला ही लकी चौक येथुन दत्त चौक मार्गे सराफ कट्टा येथे सोन्याचे दागिणे विक्री करण्यासाठी जाणार असल्याची बातमी मिळाली. त्या मिळालेल्या बातमीची सपोनि धायगुडे व त्याच्या पथकातील अंमलदार यांनी खात्री करण्यासाठी सदर ठिकाणी सापळा लावुन महिला नामे सोनम मंजुनाथ कांबळे, वय-३६ वर्षे, रा. घर नंबर-६/२/८९५५, सरकारी दवाखान्या जवळ, बापु नगर, सेडम रोड,गुलबर्गा-५८५१०२, राज्य-कर्नाटक हीस महिला अंमलदार यांचे मदतीने ताब्यात घेतले. तिच्या ताब्यात खालील प्रमाणे मुद्देमाल मिळुन आला.

| अ.क्र. | गुरन व कलम | जप्त मुद्देमालाची किमंत व वर्णन |
|---|---|---|
| १ | ७२३/२०२३ भादवि ३७९ | ९०,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने |
| २ | ७३०/२०२३ भादवि ३७९ | ६०,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने |
| ३ | ७११/२०२३ भादवि ३८० | ९०,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने |
| | एकुण | २,४०,०००/- रू |

तसेच फिर्यादी नामे- संतोष तम्मा अलकुंटे यांची ही मोटार सायकल नंबर .MH१३.BE.२३७४ ची दि.०१/०१/२०२३ रोजी छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज गेटच्या समोर पार्क केलेली वरील नंबरची मोटार सायकल ही आरोपी नामे- कल्लेश्वर बब्रुवान वचने वय-२६ रा.मु.पो.होळी ता.लोहारा जिल्हा-धाराशिव यास अंमलदार यांचे मदतीने ताब्यात घेतले.त्याचे ताब्यात खालील प्रमाणे मुद्देमाल मिळुनआला.

| | | |
|---|---|---|
| ४ | ०१/२०२४ भादविक.३७९ | ७०,०००/-रुपये किंमतीची हिरो होंडा कंपनीची स्पेल्डरप्लस मोटार सायकल |

तसेच फिर्यादी नामे-नागेश बलभिम हावळे यांचे छोटा हत्ती क्र.MH.१३.CJ.०२०७ व टाटा जीप क्र.MH.१३.AN.६९५८ या राहते घरासमोर पार्किंग केलेल्या होत्या सदर गाडीचे बॅटरी ही ब्रॅकेटचे कुलुप तोडुन आरोपी नामे -गणेश उत्तम चव्हाण वय-३७ रा.४२/१०,बुधवार पेठ,सम्राट चौक,सोलापूर यास अंमलदार यांचे मदतीने ताब्यात घेतले.त्याचे ताब्यात खालील प्रमाणे मुद्देमाल मिळुनआला.

| | | |
|---|---|---|
| ५ | ०३/२०२४ भादविक.३७९ | ९,५००/- रुपये किंमतीच्या एक्साईड कंपनीच्या दोन बॅटऱ्या. |

सपोनि एस.एस.धायगुडे व त्यांचे तपास पथकाने कौशल्याने तपास वरील आरोपीकडुन ३,१९,५००/- रू (तीन लाख,एक्कोनीस हजार,पाचशे रुपये) किंमतीचा मुद्देमाल असे एकुण ५.५ तोळे वजनाचे सोन्याचे दागिणे,एक हिरो होंडा कंपनीची स्पेल्डरप्लस मोटार सायकल व ९,५००/- रुपये किंमतीच्या एक्साईड कंपनीच्या दोन बॅटऱ्या असा एकुण ३,१९,५००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करून फौजदार चावडी पोलीस ठाणेकडील -५ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

सदरची कामगिरी मा.डॉ.श्री.राजेंद्र माने, पोलीस आयुक्त सो, सोलापूर शहर, मा.श्री.विजय कबाडे, पोलीस उप-आयुक्त सो, सोलापूर शहर, मा. श्री.संतोष गायकवाड, सहा.पोलीस आयुक्त सो, विभाग-१, सोलापूर शहर, मा.श्री.विश्वनाथ सिद, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.विकास देशमुख, पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख सहा.पोलीस निरीक्षक शंकर धायगुडे,पोहवा.प्रविण चुंगे, अजय पाडवी, आयाज बागलकोटे, अर्जुन गायकवाड, कृष्णाथ बडुरे, विनोद व्हटकर, विनोद पुजारी, सुधाकर माने,पंकज घाडगे, अजय चव्हाण, सचिनकुमार लवटे,नितीन मोरे,तौसिफ शेख, अमोल खरटमल, शशिकांत दराडे, नागनाथ गुळवे यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक फौजदार चावडी पो. स्टे., सोलापूर (शहर)

(विश्वनाथ सिद)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
फौजदार चावडी पोलीस स्टेशन

Scanned by CamScanner

